महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/९१९१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २९/०४/२०२१

# पूरकपत्र

**विषय : करोना विषाणू रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना सहायता करणेबाबत.**

**संदर्भ :** १) मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ८४३९ दि. २०.०४.२०२१.
२) मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/९०९९ दि. २८.०४.२०२१
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची दिनांक १४.०३.२०२० रोजीची शासन अधिसूचना.

कोवीड- १९ मुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीमध्ये संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकान्वये कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विविध हितकारक निर्णय व अनुषंगीक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. ४ (क) नुसार ज्या कर्मचाऱ्यांना कोवीड-१९ विषाणूची बाधा झाली आहे / होती या विषयी विलगीकरण / उपचार कालावधी कर्तव्य कालावधी समजण्याबाबत निर्गमित केलेल्या तरतुदीबाबत संदर्भ क्र. २ अन्वये तपशिलवार सूचना देण्यात आल्या होत्या. त्याबाबत बऱ्याच कर्मचाऱ्यांकडून विविध शंका व प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तसेच संदर्भ क्र. ३ मधील शासन अधिसूचनेनुसार कोवीड-१९ ची बाधा झाल्यानंतर १४ दिवस विलगीकरण करण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत त्यानुसार कंपनीचे धोरण शासनाच्या तरतुदींशी सुसंगत असणे आवश्यक आहे याकरीता खालीलप्रमाणे सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. सुधारीत मार्गदर्शक सूचना :-

क) एखादा कर्मचारी कोवीड-१९ बाधित असल्याचे आढळल्यास त्याने सदरची बाब त्याच्या नियंत्रण अधिकाऱ्यास तात्काळ कळविणे आवश्यक राहील, जेणेकरून सदर कर्मचाऱ्यास आवश्यक ती सर्व सहाय्यता पुरविणे शक्य होईल तसेच संबंधित क्षेत्रातील अत्यावश्यक सेवांकरीता विद्युत पुरवठा सुरू ठेवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे देखील शक्य होईल.

ख) कोवीड-१९ बाधित आढळलेल्या कर्मचाऱ्याच्या चाचणी अहवालच्या दिनांकापासून कर्मचारी कामावर रूजू होईपर्यंत किंवा १४ दिवसांच्या अनुपस्थितीचा कालावधी (या पैकी जो कालावधी कमी असेल) हा कर्तव्य कालावधी समजण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची रजा सादर करणे आवश्यक नाही. परंतू कर्मचाऱ्याने चाचणी अहवाल नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहील.

ग) एखादा कर्मचारी पूर्वीपासून मंजूर रजेवर असताना कोवीड-१९ बाधित झाल्यास तो बाधित झाल्याच्या दिनांकापासून वरील (ख) नुसार कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

घ) कोवीड-१९ बाधित कर्मचाऱ्याच्या अनुपस्थितीमध्ये अन्य कर्मचाऱ्यास त्याच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला असल्यास अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला कर्मचारी सदर भत्ता मिळण्यास पात्र असेल.

च) माहे मार्च २०२० पासून आजअखेर विलगीकरण/ कोवीड-१९ उपचारांकरीता ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या खात्यावरील रजा खर्ची पडली असेल, अशा प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याने Employee Portal द्वारे वैद्यकीय कागदपत्रे सादर केल्यानंतर सदर कागदपत्रांच्या आधारे त्याचा रजा कालावधी वरील सूचनांनुसार कर्तव्य कालावधी समजण्यात यावा व खर्ची पडलेली रजा पुनःश्च संबंधिताच्या खात्यावर जमा करण्यात यावी. जे कर्मचारी वरील कालावधीमध्ये सेवानिवृत्त झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचा पुनर्विचार करण्यात येणार नाही.

३. सबब, सर्व सक्षम अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेउन कोवीड-१९ बाधित कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. दि. २०.०४.२०२१ रोजीच्या परिपत्रकास अनुसरून यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले पूरकपत्र क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/९०९९ दि. २८.०४.२०२१ रद्द समजण्यात यावे.

५. सदर पूरकपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
३) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
४) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**

१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
२) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
४) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.